नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

1000

**वाचा :-** १) उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांचेकडून दिनांक १८/१०/२०११ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७३/२०११/जा.८४८, दि.२५/१०/२०११, ०९/११/२०११ व २४/११/२०११.

३) या कार्यालयाची "अंतरिम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७३/२०११/जा.८४९ दि.२५/१०/२०११

४) अ.शि.दुकान क्र. १७ अ ११८ मध्ये मदतनिस सुभाष भगीरथ अगरवाल, अ.शि. दुकान क्र. १७ अ ११८ चे मालक सुरेश भगीरथ अगरवाल, ट्रक क्र. एमएच-४३-यु-८५९७ चे चालक व मालक राधेशाम छोटेलाल केसरवानी तसेच मे. सोनल ट्रेडिंग कंपनीचे मालक दिनेश लधाराम नाखुवा यांचे दि.०७/१२/२०११ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

CONTROLLER ... DIRECTOR OF CIVIL SUPPLIES

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७३/२०११/जा.७७
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०.
दिनांक :- २७/०१/२०१२.

**आदेश**

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ११/१०/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार, ९० फुट रोड, गांधीनगर, धारावी, मुंबई - १७ या परिसरातून सरकारी शिधाजिन्नसाचा (गहू) याची अवैधरित्या वाहतूक होणार असल्याने या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी दोन पंचासह ५:२५ वाजता उक्त ठिकाणी येऊन पोहचले. सदर रस्त्याने पथक पुढे पुढे जात असताना काही संशयास्पद हालचाली होत आहे किंवा कसे ? याची बारकाईने पहाणी करत असतांना कामराज मेमोरियल इंग्लिश स्कुल समोरील रस्त्यावर आले असता, एक इसम पाठीवर गोणी घेऊन घाईघाईने एका ट्रकमध्ये टाकत असल्याचे अधिकाऱ्यांच्या व पंचाच्या निदर्शनास आले. अधिकाऱ्यांनी पंचाना ट्रककडे जाण्याचे सुचविले. त्यानुसार अधिकारी व पंचाने धावत धावत जावून सदर व्यक्तीस ताब्यात घेतले. अधिकाऱ्यांनी येण्याचे प्रयोजन सांगून गाडीची चावी व गाडीचे कागदपत्र ताब्यात घेतले. त्या इसमास त्याचे नांव विचारले असता त्याने त्याचे नांव मुन्ना छोटेलाल केसरवानी असे पंचासमक्ष सांगून गेल्या ५ वर्षापासून गाडी चालवित असल्याचे सांगितले. गाडी क्र. एमएच-४३-यु-८५९७ ही त्याच्या भावाच्या (राधेशाम केसरवानी) मालकीची असून तो गाडी चालवित असल्याचे सांगितले.

अधिकाऱ्यांनी त्यास गव्हाची गोणी ट्रकमध्ये एवढया घाईघाईने का भरत आहे, याबाबत विचारणा केली असता, त्याने सदरचा गहू अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ ११८ पत्ता हनुमान प्रो. स्टोअर्स, गांधीनगर, ९० फुट रोड, शॉप क्र. ३७ अे.बी., धारावी या दुकानातून खरेदी करुन गाडीमध्ये भरत असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी त्याच्याकडे सदर गहू खरेदीबाबत बीलाची मागणी केली असता, त्याच्याकडे कोणतेही बील उपलब्ध होऊ शकले नाही. गाडीमध्ये अगोदरच भरलेल्या गोण्यांबाबत अधिकाऱ्यांनी त्याच्याकडे विचारणा केली असता, त्याने त्याचा सह ड्रायव्हर नझीर अहमद याने सदरचा गहू कोठून घेतला, याबाबत काही माहिती नसल्याचे सांगितले. तसेच नझीर अहमद जेवायला गेल्यामुळे गाडी त्याच्या ताब्यात देऊन गेल्याने सदरचा माल भरण्याचे काम ते स्वत: करीत असल्याचे सांगितले. नझीर अहमद यांच्याबाबत अधिकाऱ्यांनी अधिक विचारणा केली असता, तो दोन तीन दिवसापासूनच बदली ड्रायव्हर म्हणून काम करीत असल्याने त्याचा पत्ता माहिती नसल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी नझीर अहमद याच्या भ्रमणध्वनीबाबत मुन्ना छोटेलाल केसरवानी याच्याकडे विचारले असता, त्याचा क्रमांक ९७०२१०८३३४ असे सांगितले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी सदर भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

अधिकाऱ्यांनी त्यास अधिक विचारणा केली असता, सदर दुकानातून एकूण ६ बाचके गहू भरणार असल्याचे सांगून एक बाचका गहू गाडीमध्ये टाकत असतांना अधिकाऱ्यांनी त्यास ताब्यात घेतले व याबाबतचा जबाब अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष नोंदवून घेतला. तद्नंतर अधिकाऱ्यांनी मुन्ना छोटेलाल केसरवानी यांना सोबत घेऊन त्याने जबाब दिल्याप्रमाणे अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ ११८ पत्ता हनुमान प्रो. स्टोअर्स, गांधीनगर, ९० फुट रोड, शॉप क्र. ३७ अे.बी., धारावी या दुकानासमोर आले. सदर दुकानात उपस्थित व्यक्तीस अधिकाऱ्यांनी आपली ओळख सांगून येण्याचे प्रयोजन सांगितले व सदर इसमास त्याचे नांव गाव विचारले असता त्याने त्याचे नांव सुभाष भगीरथ अगरवाल असे सांगून तो बालिका नगर, जस्मीन मिल रोड, बिल्डिंग क्र. ८/७२०, धारावी, मुंबई - १७ येथे राहत असल्याचे सांगितले.

RATIONING ... MUMBAI

शिधावाटप दुकान क्र. १७ अ ११८ हे त्यांचे भाऊ सुरेश भगीरथ अगरवाल यांचे नावे असून सदर दुकानात मदत करण्याचे काम गेल्या १० वर्षापासून करीत असल्याचे सांगितले. दिनांक १८/१०/२०११ रोजी सुभाष भगीरथ अगरवाल यांनी मुन्ना छोटेलाल केसरवानी यास सदर रेशन दुकानातून ५० किलो भरतीचा शासन नियंत्रित दराचा एक गव्हाचा बाचका दिल्याचे कबूल केले. त्याबाबत पथकाने विक्रीबाबतच्या बिलाची मागणी केली असता, त्याने कोणतेही बिल उपलब्ध करुन दिले नाही. तथापी, अजून ५० किलो भरतीचे ५ बाचके अनधिकृतपणे मुन्ना छोटेलाल केसरवानी यास विकणार असल्याचे सांगून त्याने श्री. गणेश ट्रेडिंग कंपनी, डी/३१, ए.पी.एम.सी. मार्केट, फेज २, वाशी, नवी मुंबई चे बिल क्र. १८९० दिनांक १८/०८/२००९, बिल क्र. २१०२ दिनांक २४/०८/२०११ व बिल क्र. २२१९ दिनांक ०७/०९/२०११ अशा गव्हाची बिले दाखवून सदर गहू तेथून आणल्याचे सांगून खराब असल्यामुळे

पुन्हा त्याच ठिकाणी परत पाठविणार असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी सदर बिलाच्या अनुषंगाने ए.पी.एम.सी. मार्केट येथील ग्रोमा या संस्थेचे काम पाहणारे श्री. मयुर सोनी यांचे भ्रमणध्वनी क्र. ९८२००७६६०८ वर विचारणा केली असता, श्री. गणेश ट्रेडिंग कंपनी या नावाची संस्था तेथे नसल्याचे सांगून सदर पत्त्यावर भव्य रचना कंपनी अस्तीत्वात असल्याचे सांगितले.

दरम्यानच्या कालावधीमध्ये शाहूनगर पोलिस ठाणे येथे सदर घटनेची माहिती देऊन सदर पोलिस ठाणे येथील पोलिस शिपाई श्री. विजय राघो, ब.क्र. ०४०६३१ यांनी घटनास्थळी येऊन घटनास्थळाची व जप्त मुद्देमालाची पहाणी केली.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा गहू अवैधमार्गाने प्राप्त करुन अनधिकृतरित्या विकून व खरेदी करुन गरजू पात्र शिधापत्रिकाधारकांना गव्हापासून वंचित ठेवून तो स्वत:च्या फायद्यासाठी व विक्री करण्यासाठी आढळून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ (२) दि बॉम्बे रेशनिंग एरिया शेडयुल कमोडिटीज (रेग्युलेशन ऑफ डिस्ट्रिब्युशन) ऑर्डर, १९८६ चे कलम ४, ५, ६, ७, ८ तसेच (३) दि महाराष्ट्र फुड ग्रेन्स रेशनिंग (सेकंड) रेग्युलेशन १९६६ चे कलम १८(३) (अअअ) चा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द शाहुनगर पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्थ.गु.र.क्र.२१/२०११ दिनांक ११/१०/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | ५० किलो भरतीच्या १०३ बाचकी गहू | ५१५० किलो | ९७,८५०/- |
| २ | गाडी / ट्रक क्र. एमएच-४३-यु-८५९७ | १ नग | ९,००,०००/- |
| | | एकूण | ९,९७,८५०/- |

सबब, उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि.०८/११/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक ०८/११/२०११ रोजीच्या सुनावणीस अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ ११८ मध्ये मदतनिस सुभाष भगीरथ अगरवाल, अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ ११८ चे मालक सुरेश भगीरथ अगरवाल तसेच ट्रक

क्र.एमएच-४३-यु-८५९७ चे चालक व मालक राधेशाम छोटेलाल केसरवानी हे उपस्थित राहिले. तसेच संबंधितांच्या वतीने वकालातनामा सादर करुन उपस्थित असलेले ॲड. डी.आर. गुप्ता यांनी लेखी निवेदन सादर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी व इतर आरोपी/अपचारी उपस्थित नव्हते. सुनावणीस उपस्थित असलेले अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ ११८ चे मालक सुरेश भगीरथ अगरवाल यांनी सदरचा साठा मे. सोनल ट्रेडिंग कंपनी, एम-१६, ए.पी.एम.सी. मार्केट, फेस २, वाशी, नवी मुंबई येथून खरेदी केल्याचे सांगितले व घटनास्थळी दिलेल्या जबाबात ट्रकचे चालक यांनी मे. श्री गणेश ट्रेडिंग कंपनी, डी-३१, ए.पी.एम.सी. मार्केट, फेस २, वाशी, नवी मुंबई यांचे बिल सादर केले. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १७/११/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १७/११/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि.०७/१२/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ ११८ मध्ये मदतनिस सुभाष भगीरथ अगरवाल, अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ ११८ चे मालक सुरेश भगीरथ अगरवाल तसेच ट्रक क्र. एमएच-४३-यु-८५९७ चे चालक व मालक राधेशाम छोटेलाल केसरवानी व त्यांच्या वतीने ॲड. डी.आर. गुप्ता हे उपस्थित राहिले. तसेच मे. सोनल ट्रेडिंग कंपनीचे मालक दिनेश लधाराम नाखुवा हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ५ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

## युक्तिवाद :-

दिनांक ०७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ट्रक क्र. एमएच-४३-यु-८५९७ चे चालक व मालक राधेशाम छोटेलाल केसरवानी यांनी युक्तीवाद केला की, त्याचा वरील ट्रक क्र. एमएच-४३-यु-८५९७ आपल्या कार्यालयातील निरिक्षकांनी दि.११/१०/२०११ रोजी गांधी नगर, ९० फुट रोड, धारावी या ठिकाणी अ.शि.दु.क्र. १७ अ ११८ येथे उभा करुन माल भरीत असताना त्याच्या ट्रक मधील १०३ गव्हाच्या पोती जप्त केल्या. निरिक्षकांनी विचारणा केली असता त्याने सांगितले की, ट्रकमध्ये उपलब्ध गव्हाची पोती ही त्याच्या आधी असलेला ट्रक चालक याने अ.शि.दु.क्र. १७ अ ११८ च्या गोडावून मधून १०० पोती भरलेली होती. सदर १०० पोती (५० किलो प्रत्येकी) गहू हा त्याच्या आधीच्या चालकाने भरुन सदर ट्रक त्याच्या ताब्यात दिला आणि दुकानात जाऊन राहिलेला माल भरुन घ्या असे सांगून तो निघून गेला. तो उर्वरित माल दुकानातून भरताना आपल्या निरिक्षकाने त्याच्या ट्रकची

तपासणी करुन ताब्यात घेतला. त्यावेळेस त्याने अ.शि.दु.क्र. १७ अ ११८ या दुकानातून ३ पोती गहू भरला होता. सदर गव्हाची पोती भरलेला ट्रक त्याला वाशी मार्केट येथील व्यापाऱ्यांना परत करण्यासाठी न्यावयाचा होता. परंतू त्याआधीच आपल्या अधिकाऱ्यांनी त्याचा ट्रक चौकशीसाठी ताब्यात घेतला. त्यावेळेस दुसरा चालक हा तेथून पळून गेला. तो आजपर्यंत मिळून आला नाही. तो ट्रक ड्रायव्हर बदली ड्रायव्हर म्हणून त्याचेकडे काम करत होता. म्हणून त्याला त्याचा पत्ता माहित नाही. वरील नोटीसी अनुसरुन तो त्यांचे हे म्हणणे लेखी स्वरुपात देत आहे, त्याचा सहानभूतीपूर्वक विचार करुन, त्याला वरील प्रकरणातून मुक्त करावे, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ ११८ मध्ये मदतनिस सुभाष भगीरथ अगरवाल यांनी युक्तीवाद केला की, अ.शि.दु.क्र. १७ अ ११८ हे दुकान त्याचा भाऊ श्री. सुरेश भगिरथ अगरवाल यांच्या नावे असून सदर दुकानात त्यांना मदतनीस म्हणून कधी कधी काम करीत असतो. दि.११/१०/२०११ रोजी त्याचा भाऊ आजारी असल्यामुळे तो त्या दिवशी दुकानाचे कामकाज पाहण्यास आला होता. आपल्या कार्यालयातील निरिक्षकांनी दि.११/१०/२०११ रोजी गांधी नगर, ९० फुट रोड, धारावी या ठिकाणी अ.शि.दु.क्र. १७ अ ११८ समोर उभी करुन माल भरीत असताना चौकशीसाठी म्हणून ट्रकमधील १०३ गव्हाच्या पोती जप्त केल्या. आपल्या निरिक्षकांनी सदर गव्हाच्या पोत्यांबाबत विचारणा केली असता त्याने सांगितले की, सदर ट्रकमध्ये उपलब्ध असलेली गव्हाची पोती ही त्याच्या गोडावूनमधून भरलेली आहेत. सदर माल हा खुल्या बाजारातील असून सदर माल खराब असल्यामुळे हा वाशी मार्केट या ठिकाणी परत पाठविण्यास भरण्यात आला होता. तसेच सदर १२० पोती गहू हा दिनांक १०/१०/२०११ रोजी वाशी मार्केट येथून खुल्या बाजारातून त्याच्या दुकानात विक्रीसाठी आलेला होता. सदर १२० गोण्यांपैकी, १०० गोण्या गोडावूनमध्ये ठेवलेल्या होत्या आणि उर्वरित २० गोण्या विक्रीसाठी दुकानामध्ये ठेवण्यात आलेल्या होत्या. सदर मालाची पावती त्याच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे तो घाई गडबडीने आपल्या अधिकाऱ्यांना १ महिन्या आधीचे दुसऱ्या दुकानाची म्हणजे गणेश ट्रेडिंग कंपनी या ठिकाणीचे दुसऱ्या दुकानाचे बिल उपलब्ध करुन दिले. त्याला वाटले की सदरचा माल हा गणेश ट्रेडिंग कंपनी या ठिकाणाहून आलेला असेल परंतू ते बिल दुसऱ्या दुकानाचे आहे, हे त्याच्या लक्षात आले नाही. वरील संदर्भात जेव्हा त्याने घरी जाऊन त्याच्या भावाजवळ चौकशी केली असता त्याने सांगितले की, सदर गहू हा सोनल ट्रेडिंग कंपनी, वाशी या ठिकाणाहून आलेला गहू होता आणि त्याचे बिल हे दलालाजवळ असल्यामुळे त्याला मिळून आले नाही. परंतू सदर बाबत त्याने आपल्या उपनियंत्रक अधिकारी यांच्या समक्ष सुनावणीच्या छायांकित प्रत उपलब्ध केलेली होती. वरील प्रकरणात कुठल्याही प्रकारचा गैरप्रकार झालेला नाही. तरी वरील नोटीसी अनुसरुन तो त्याचे हे म्हणणे लेखी स्वरुपात देत आहे, त्याचा सहानभूतीपूर्वक विचार करुन, त्याला वरील प्रकरणातून मुक्त करावे, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केली.

हा खुल्या बाजारातील असून सदर माल खराब असल्यामुळे हा वाशी मार्केट या ठिकाणी परत पाठविण्यास भरण्यात आला होता. सदर मालाची पावती त्याच्या दलालाकडे होती. म्हणून ती दुकानामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याच्या भावाने घाई गडबडीने आपल्या अधिकाऱ्यांना १ महिन्या आधीची दुसऱ्या दुकानाची म्हणजे गणेश ट्रेडिंग कंपनी या ठिकाणचे दुसऱ्या दुकानाचे बिल उपलब्ध करुन दिले. तसेच सदर १२० पोती गहू हा दिनांक १०/१०/२०११ रोजी वाशी मार्केट येथून खुल्या बाजारातून त्यांच्या दुकानात विक्रीसाठी आलेला होता. सदरचा माल हा गणेश ट्रेडिंग कंपनी या ठिकाणाहून आलेला असेल परंतू ते बिल दुसऱ्या दुकानाचे आहे, हे त्याच्या लक्षात आले नाही.

तथापी, मे. सोनल ट्रेडिंग कंपनीचे मालक दिनेश लधाराम नाखुवा यांनी सुनावणीच्या वेळेस केलेल्या खुलाशात, दि.१४/१०/२०११ रोजी दुपारनंतर हनुमंत प्रो. स्टोअर्स, धारावी यांनी त्यांच्या मार्केटमधील लोकल दलाल श्री. गोविंद किशोर यांच्याकडून १२० कट्टा प्रत्येकी ५० किलो वजनाचे लोकवन गव्हाचे बिल दिनांक १०/१०/२०११ अशी जुनी तारीख नमूद करुन प्राप्त करुन घेतले आहे. तथापी, दि.११/१०/२०११ रोजीच्या बिलामधील ५० किलो वजनाचा गव्हाचा साठा दि.११/१०/२०११ रोजी त्यांच्या गोडावूनमध्ये उपलब्ध नव्हता. म्हणून त्यांच्या डिलिव्हरी लिपिकाने दि.१७/१०/२०११ रोजी डिलिव्हरीच्या वेळेस ३० किलो वजनाचे २०० बाचके लोकवन गव्हाचे डिलिव्हरी केली असून त्याची डुप्लीकेट प्रत त्यांचेकडे उपलब्ध आहे. दि.११/१०/२०११ रोजी धाडीच्या वेळेस सदर दुकानदाराने वेगळ्या व्यापारी नावाचे बिल सादर केले. त्याच्याकडील मे. सोनल ट्रेडिंग कंपनी या नावाचे बिल त्यांनी घटनेच्या चार दिवसानंतर घेऊन त्यांना सदर प्रकरणी गोवण्याचा प्रयत्न करीत असल्याचे नमूद करुन त्यांनी दि.०३/१२/२०११ रोजी पोलिसांसमक्ष दिलेला जबाबात नमूद केले आहे.

प्रस्तूत प्रकरणी, ट्रक क्र. एमएच-४३-यु-८५९७ चे चालक व मालक राधेशाम छोटेलाल केसरवानी उर्फ मुन्ना केसरवानी, अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ/११८ या दुकानातील मदतनीस सुभाष भगीरथ अगरवाल व अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ/११८ या दुकानाचे मालक सुरेश भगीरथ अगरवाल या सर्व संबंधीतांनी केलेला खुलासा पाहता, सदरचा जप्त गव्हाचा साठा हा अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ/११८ या दुकानातील नियंत्रित दराने पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरीत करावयाचा गहू असल्याचे निष्पन्न होत आहे. सद्य:स्थितीत माझ्या समोर सकृतदर्शनी दिसून येत असलेल्या वस्तुस्थितीवरुन सर्व संबंधितांनी केलेले खुलासे मोघम स्वरुपाचे व दिशाभूल करणारे असून, आरोपी यांनी परस्पराशी संगनमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा शासन नियंत्रीत दराचा गहू बेकायदेशीररित्या व अवैधमार्गाने मिळवून त्याची जादा नफेखोरीच्या उद्देशाने खरेदी, विक्री व विनापरवाना वाहतूक केली असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सबब, जप्त गव्हाच्या साठ्यासंदर्भात पारित करण्यात आलेले "क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७३/२०११/ जा.८४९, दिनांक २५/१०/२०११" चे अंतरिम आदेश कायम करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

दिनांक ०७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ ११८ चे मालक सुरेश भगीरथ अगरवाल यांनी युक्तीवाद केला की, अ.शि.दु.क्र. १७ अ ११८ हे दुकान त्याचे नावे असून सदर दुकानात तो स्वत: काम करीत असतो, त्याच्या अनुपस्थितीत मदतनीस म्हणून त्याचा भाऊ श्री. सुभाष भगिरथ अगरवाल हा कधी कधी काम करीत असतो. दि.११/१०/२०११ रोजी तो आजारी असल्यामुळे त्याचा भाऊ त्या दिवशी दुकानाचे कामकाज पाहण्यास आला होता. आपल्या कार्यालयातील निरिक्षकांनी दि.११/१०/२०११ रोजी गांधी नगर, ९० फुट रोड, धारावी या ठिकाणी अ.शि.दु.क्र. १७ अ ११८ समोर उभी करुन माल भरीत असताना चौकशीसाठी म्हणून ट्रकमधील १०३ गव्हाच्या पोती जप्त केल्या. आपल्या निरिक्षकांनी सदर गव्हाच्या पोत्यांबाबत विचारणा केली असता त्याच्या भावाने सांगितले की, सदर ट्रकमध्ये उपलब्ध असलेली गव्हाची पोती ही त्याच्या गोडावूनमधून भरलेली आहेत. सदर माल हा खुल्या बाजारातील असून सदर माल खराब असल्यामुळे हा वाशी मार्केट या ठिकाणी परत पाठविण्यास भरण्यात आला होता. तसेच सदर १२० पोती गहू हा दिनांक १०/१०/२०११ रोजी वाशी मार्केट येथून खुल्या बाजारातून त्याच्या दुकानात विक्रीसाठी आलेला होता. सदर १२० गोण्यांपैकी, १०० गोण्या गोडावूनमध्ये ठेवलेल्या होत्या आणि उर्वरित २० गोण्या विक्रीसाठी दुकानामध्ये ठेवण्यात आलेल्या होत्या. सदर मालाची पावती त्याच्या दलालाकडे होती. म्हणून ती दुकानामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याच्या भावाने घाई गडबडीने आपल्या अधिकाऱ्यांना १ महिन्या आधीची दुसऱ्या दुकानाची म्हणजे गणेश ट्रेडिंग कंपनी या ठिकाणचे दुसऱ्या दुकानाचे बिल उपलब्ध करुन दिले. त्याला वाटले की सदरचा माल हा गणेश ट्रेडिंग कंपनी या ठिकाणाहून आलेला असेल परंतू ते बिल दुसऱ्या दुकानाचे आहे, हे त्याच्या लक्षात आले नाही. वरील संदर्भात जेव्हा त्याच्या भावाने घरी येऊन त्याच्याजवळ चौकशी केली असता त्याने सांगितले की, सदर गहू हा सोनल ट्रेडिंग कंपनी, वाशी या ठिकाणाहून आलेला गहू होता आणि त्याचे बिल हे दलालाजवळ असल्यामुळे मिळून आले नाही. परंतू सदर बाबत त्याने आपल्या उपनियंत्रक अधिकारी यांच्या समक्ष सुनावणीच्या छायांकित प्रत उपलब्ध केलेली होती. वरील प्रकरणात कुठल्याही प्रकारचा गैरप्रकार झालेला नाही. आपल्या माहितीसाठी सदर बिलाची छायांकित प्रत निवेदनासोबत जोडत आहे. तसेच त्याचे वरील दुकान उपनियंत्रकांच्या आदेशानुसार दि.०१/११/२०११ पासून तात्पुरते बंद करण्यात आलेले आहे आणि दुकानातील सर्व कागदपत्रे आणि रजिस्टर आपल्या निरिक्षकांच्या ताब्यात आहेत. त्याचेकडे दुसरा कुठलाही पुरावा उपलब्ध नाही. तरी वरील नोटीसी अनुसरुन तो त्याचे हे म्हणणे लेखी स्वरुपात देत आहे, त्याचा सहानभूतीपूर्वक विचार करुन, त्याला वरील प्रकरणातून मुक्त करावे आणि त्याचे दुकान त्वरीत चालू करण्याचे आदेश देण्यात यावेत, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केली.

दिनांक ०७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. सोनल ट्रेडिंग कंपनीचे मालक दिनेश लधाराम नाख्रुवा यांनी युक्तीवाद केला की, दि.१४/१०/२०११ रोजी दुपार नंतर हनुमंत प्रो. स्टोअर्स, धारावी यांनी त्यांच्या मार्केटमधील लोकल दलाल श्री. गोविंद किशोर याच्याकडून १२० कट्टा प्रत्येकी ५० किलो वजनाचे लोकवन गव्हाचे

बिल दिनांक १०/१०/२०११ अशी जुनी तारीख नमूद करुन प्राप्त करुन घेतले आहे. तथापी, सदरचा साठा प्रत्यक्षात ट्रक क्र. एमएच-०४-ईएल-८१९१ अन्वये दि.१७/१०/२०११ रोजी मे. हनुमान प्रोव्हिजन स्टोअर्स, धारावी यांना विक्री केले आहे. त्यांच्या दि.११/१०/२०११ रोजीच्या बिलामधील ५० किलो वजनाचा गव्हाचा साठा दि.११/१०/२०११ रोजी त्यांच्या गोडावूनमध्ये उपलब्ध नव्हता. म्हणून त्यांच्या डिलिव्हरी लिपिकाने दि.१७/१०/२०११ रोजी डिलिव्हरीच्या वेळेस ३० किलो वजनाचे २०० बाचके लोकवन गव्हाचे डिलिव्हरी केली असून त्याची डुप्लीकेट प्रत त्यांचेकडे उपलब्ध आहे. दि.१४/१०/२०११ रोजी ज्या बिलबुकमधून सदर दुकानदारास बिल दिले होते. ती सर्व बिले दि.१४/११/२०११ या तारखेचे आहेत. दि.११/१०/२०११ रोजी अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ ११८ चे मालक सुरेश भगीरथ अगरवाल व मदतनिस सुभाष भगीरथ अगरवाल यांचेकडे शिधावाटप अधिकारी यांनी धाड टाकून संशयास्पद गव्हाच्या गोण्या पकडल्या असता सदर साठ्याचा व त्यांनी वितरण केलेल्या ३० किलो वजनाच्या लोकवन गव्हाच्या साठ्याचा काहीएक संबंध नसून सदर लोकवन गव्हाच्या गाडीचा क्र. एमएच-४३-६५९१ हा आहे. तसेच त्यांचा सदर अगरवाल बंधूशी काहीएक संबंध व ओळख नसून त्यांचेशी कोणत्याही प्रकारचा व्यवहार केलेला नाही. दि.११/१०/२०११ रोजी धाडीच्या वेळेस सदर दुकानदाराने वेगळ्या व्यापारी नावाचे बिल सादर केले. त्यांच्याकडील मे. सोनल ट्रेडिंग कंपनी या नावाचे बिल त्यांनी घटनेच्या चार दिवसानंतर घेऊन त्यांना सदर प्रकरणी गोवण्याचा प्रयत्न करीत असल्याचे नमूद करुन बिल क्र. २३१२८७ ते २३१२९२, दि.१७/१०/२०११ रोजीचे एपीएमसी गेट पास व इन आऊट रजिस्टरच्या छायांकित प्रती तसेच त्यांनी दि.०३/१२/२०११ रोजी पोलिसां समक्ष दिलेला जबाबाची छायांकित प्रत सादर करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दि.११/१०/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार, ९० फुट रोड, गांधीनगर, धारावी, मुंबई - १७ या परिसरातून सरकारी शिधाजिन्नसाचा (गहू) याची अवैधरित्या वाहतूक होणार असल्याने या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी दोन पंचासह ५:२५ वाजता उक्त ठिकाणी कामराज मेमोरियल इंग्लिश स्कुल समोरील रस्त्यावर आले असता, एक इसम नामे मुन्ना छोटेलाल केसरवानी पाठीवर गोणी घेऊन घाईघाईने एका ट्रकमध्ये टाकत असल्याचे अधिकाऱ्यांच्या व पंचाच्या निदर्शनास आले. अधिकाऱ्यांनी सदर इसमाकडे अधिक चौकशी केली असता, तो गेल्या ५ वर्षापासून गाडी चालवित असल्याचे सांगितले. गाडी क्र. एमएच-४३-यु-८५९७ ही त्याच्या भावाच्या (राधेशाम केसरवानी) मालकीची असून तो गाडी

चालवित असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी त्यास गव्हाची गोणी ट्रकमध्ये एवढया घाईघाईने का भरत आहे, याबाबत विचारणा केली असता, त्याने सदरचा गहू अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ ११८ पत्ता हनुमान प्रो. स्टोअर्स, गांधीनगर, ९० फुट रोड, शॉप क्र. ३७ अे.बी., धारावी या दुकानातून खरेदी करुन गाडीमध्ये भरत असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी त्याच्याकडे सदर गहू खरेदीबाबत बीलाची मागणी केली असता, त्याच्याकडे कोणतेही बील उपलब्ध होऊ शकले नाही. गाडीमध्ये अगोदरच भरलेल्या गोण्यांबाबत अधिकाऱ्यांनी त्याच्याकडे विचारणा केली असता, त्याने त्याचा सह ड्रायव्हर नझीर अहमद याने सदरचा गहू कोठून घेतला, याबाबत काही माहिती नसल्याचे सांगितले. तसेच नझीर अहमद जेवायला गेल्यामुळे गाडी त्याच्या ताब्यात देऊन गेल्याने सदरचा माल भरण्याचे काम ते स्वत: करीत असल्याचे सांगितले. नझीर अहमद यांच्याबाबत अधिकाऱ्यांनी अधिक विचारणा केली असता, तो दोन तीन दिवसापासूनच बदली ड्रायव्हर म्हणून काम करीत असल्याने त्याचा पत्ता माहिती नसल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी नझीर अहमद याच्या भ्रमणध्वनीबाबत मुन्ना छोटेलाल केसरवानी याच्याकडे विचारले असता, त्याचा क्रमांक ९७०२१०८३३४ असे सांगितले. तदनंतर अधिकाऱ्यांनी सदर भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही. अधिकाऱ्यांनी त्यास अधिक विचारणा केली असता, सदर दुकानातून एकूण ६ बाचके गहू भरणार असल्याचे सांगून एक बाचका गहू गाडीमध्ये टाकत असतांना अधिकाऱ्यांनी त्यास ताब्यात घेतले व याबाबतचा जबाब अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष नोंदवून घेतला. तदनंतर अधिकाऱ्यांनी मुन्ना छोटेलाल केसरवानी यांना सोबत घेऊन त्याने जबाब दिल्याप्रमाणे अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ ११८ पत्ता हनुमान प्रो. स्टोअर्स, गांधीनगर, ९० फुट रोड, शॉप क्र. ३७ अे.बी., धारावी या दुकानासमोर आले. सदर दुकानात उपस्थित व्यक्तीने अधिकाऱ्यांना त्याचे नांव सुभाष भगीरथ अगरवाल असे सांगून तो बालिका नगर, जस्मीन मिल रोड, बिल्डिंग क्र. ८/७२०, धारावी, मुंबई - १७ येथे राहत असल्याचे सांगितले. शिधावाटप दुकान क्र. १७ अ ११८ हे त्यांचे भाऊ सुरेश भगीरथ अगरवाल यांचे नावे असून सदर दुकानात मदत करण्याचे काम गेल्या १० वर्षांपासून करीत असल्याचे सांगितले. दि.१८/१०/२०११ रोजी सुभाष भगीरथ अगरवाल यांनी मुन्ना छोटेलाल केसरवानी यास सदर रेशन दुकानातून ५० किलो भरतीचा शासन नियंत्रित दराचा एक गव्हाचा बाचका दिल्याचे कबूल केले. त्याबाबत पथकाने विक्रीबाबतच्या बिलाची मागणी केली असता, त्याने कोणतेही बिल उपलब्ध करुन दिले नाही. तथापी, अजून ५० किलो भरतीचे ५ बाचके अनधिकृतपणे मुन्ना छोटेलाल केसरवानी यास विकणार असल्याचे सांगून त्याने श्री. गणेश ट्रेडिंग कंपनी, डी/३१, ए.पी.एम.सी. मार्केट, फेज २, वाशी, नवी मुंबई चे बिल क्र. १८९० दिनांक १८/०८/२००९, बिल क्र. २१०२ दिनांक २४/०८/२०११ व बिल क्र. २२१९ दि.०७/०९/२०११ अशा गव्हाची बिले दाखवून सदर गहू तेथून आणल्याचे सांगून खराब असल्यामुळे पुन्हा त्याच ठिकाणी परत पाठविणार असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी सदर बिलाच्या अनुषंगाने ए.पी.एम.सी. मार्केट येथील ग्रोमा या संस्थेचे काम पाहणारे श्री. मयुर सोनी यांचे भ्रमणध्वनी क्र. ९८२००७६६०८ वर विचारणा केली असता, श्री. गणेश ट्रेडिंग कंपनी या नावाची

संस्था तेथे नसल्याचे सांगून सदर पत्त्यावर भव्य रचना कंपनी अस्तीत्वात असल्याचे सांगितले. अशाप्रकारे संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन एक ट्रक व ५० किलो वजनाच्या १०३ बाचकी (५१५० किलो) गहू असा एकूण ९,९७,८५०/- रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ट्रक क्र. एमएच-४३-यु-८५९७ चे चालक व मालक राधेशाम छोटेलाल केसरवानी उर्फ मुन्ना केसरवानी यांनी सुनावणीच्या वेळेस केलेल्या खुलाशात, दि.११/१०/२०११ रोजी निरिक्षकांनी घटनास्थळी त्याचा ट्रक ताब्यात घेतला असता, त्यावेळेस तो अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ/११८ येथे उभा करुन माल भरीत असतांना त्याच्या ट्रकमधील १०३ गव्हाच्या पोती जप्त केल्याचे सांगितले. तसेच अधिकाऱ्यांसमक्ष सदर गव्हाचा साठा ट्रक चालक याने १७ अ/११८ च्या गोडावूनमधून भरुन सदर ट्रक त्याच्या ताब्यात दिला व राहिलेला मालापैकी उर्वरीत माल १७ अ/११८ या दुकानातून ३ पोती भरत असतांना अधिकाऱ्यांनी त्यास व त्याचा ट्रक मुद्देमालासह ताब्यात घेतला, असे नमूद केले आहे. तसेच त्याने दि. ११/१०/२०११ रोजी घटनास्थळी दिलेल्या जबाबात, सदर ट्रकमध्ये गव्हाचा साठा अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ/११८ या दुकानातून खरेदी करुन भरत असल्याचे सांगितले.

अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ/११८ या दुकानातील मदतनीस सुभाष भगीरथ अगरवाल याने केलेल्या खुलाशात, अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ/११८ समोर ट्रक उभा करुन माल भरीत असतांना सदर ट्रकमधील १०३ गव्हाच्या पोती जप्त केल्या आहेत व सदर माल खुल्या बाजारातील असून खराब असल्यामुळे हा वाशी मार्केट येथे परत पाठविण्याकरिता भरत असल्याचे सांगितले. तसेच सदर मालाची पावती त्याचेकडे उपलब्ध नसल्याने त्याने घटनास्थळी घाई गडबळीने एक महिन्या आधीची मे. गणेश ट्रेडिंग कंपनी या दुकानाचे बिल उपलब्ध करुन दिल्याचे नमूद केले आहे.

तथापी, अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ/११८ या दुकानातील मदतनीस सुभाष भगीरथ अगरवाल यांनी दि.११/१०/२०११ रोजी घटनास्थळी दिलेल्या जबाबात, सदरच्या शासनमान्य दुकानामधील ५० किलो भरतीचा शासन नियंत्रित दराचा गव्हाचा साठा अनधिकृतपणे ट्रकचे चालक मुन्ना छोटेलाल केसरवानी यास विकल्याचे कबूल केले आहे. तसेच अधिकाऱ्यांनी विक्री बिलाची मागणी केली असता, सुभाष भगीरथ अगरवाल याने श्री गणेश ट्रेडिंग कंपनी, डी-३१, एपीएमसी मार्केट, फेस २, वाशी, नवी मुंबई ची बिले सादर केली. परंतू अधिकाऱ्यांनी सदर आस्थापनेबाबत एपीएमसी मार्केटमधील ग्रोमा या संस्थेकडे चौकशी केली असता, श्री गणेश ट्रेडिंग कंपनी या नावाची संस्था तेथे नसल्याचे सांगून सदर पत्त्यावर भव्य रचना कंपनी अस्तित्वात असल्याचे सांगितले.

अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ ११८ चे मालक सुरेश भगीरथ अगरवाल यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, दि.११/१०/२०११ रोजी गांधी नगर, ९० फुट रोड, धारावी या ठिकाणी अ.शि.दु.क्र. १७ अ ११८ समोर उभी करुन माल भरीत असताना चौकशीसाठी म्हणून ट्रकमधील १०३ गव्हाच्या पोती जप्त केल्या. सदर माल

जप्त केलेला ट्रक क्र. एमएच-४३-यु-८५९७ हा राधेशाम छोटेलाल केसरवानी यांचे मालकीचा असल्याचे त्यांनी सादर केलेल्या निवेदनावरुन दिसून येते. तसेच सदर ट्रक मालकाने सुनावणीचे वेळी सादर केलेल्या लेखी खुलाशात, त्याचा ट्रक क्र. एमएच-४३-यु-८५९७ दि.११/१०/२०११ रोजी गांधी नगर, ९० फुट रोड, धारावी या ठिकाणी अ.शि.दु.क्र. १७ अ ११८ येथे उभा करुन माल भरीत असताना त्याच्या ट्रक मधील १०३ गव्हाच्या पोती जप्त केल्या. ट्रकमध्ये उपलब्ध गव्हाची पोती ही त्याच्या आधी असलेला ट्रक चालक याने अ.शि.दु.क्र. १७ अ ११८ च्या गोडावून मधून १०० पोती भरलेली होती. सदर १०० पोती (५० किलो प्रत्येकी) गहू हा त्याच्या आधीच्या चालकाने भरुन सदर ट्रक त्याच्या ताब्यात दिला आणि दुकानात जाऊन राहिलेला माल भरुन घ्या असे सांगून तो निघून गेला. त्यावेळेस त्याने अ.शि.दु.क्र. १७ अ ११८ या दुकानातून ३ पोती गहू भरला होता. तसेच घटनास्थळी दिलेल्या जबाबात, त्यांनी सदर गव्हाचा साठा अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ/११८, हनुमान प्रोव्हिजन स्टोअर्स, गांधी नगर, ९० फुट रोड, धारावी या दुकानातून भरल्याचे मान्य केले आहे. यावरुन ट्रक मालकाचा सदर गुन्हा नोंद प्रकरणी प्रत्यक्ष सहभाग असल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-४३-यु-८५९७ हा त्याच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास ट्रकचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा ट्रक मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये शाहुनगर पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.र.क्र. २१/२०११ दिनांक ११/१०/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) या कार्यालयाचे दि २५/१०/२०११ रोजीचे अंतरिम आदेश या आदेशान्वये कायम करण्यात येत आहेत.

२) जप्त करण्यात आलेली गाडी / ट्रक क्र. एमएच-४३-यु-८५९७ हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर ट्रकच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास ट्रकचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

३) अथवा ट्रक मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचा ट्रक लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) ट्रक क्र. एमएच-४३-यु-८५९७ चे चालक, मुन्ना छोटेलाल केसरवानी
२) ट्रक क्र. एमएच-४३-यु-८५९७ चे मालक, राधेशाम केसरवानी
३) ट्रक क्र. एमएच-४३-यु-८५९७ चा सह ड्रायव्हर नझीर अहमद
४) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ ११८ चे मालक सुरेश भगीरथ अगरवाल
५) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. १७ अ ११८ मध्ये मदतनिस सुभाष भगीरथ अगरवाल
६) मे. सोनल ट्रेडिंग कंपनी, एम-१६, ए.पी.एम.सी. मार्केट, फेस २, वाशी, नवी मुंबई
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शाहुनगर पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, शाहुनगर पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय यांना माहितीकरीता.
५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.